संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# स्मार्ट खेडी तयार करण्यासाठी योग्य निर्णय

**केंद्र सरकार** काय किंवा राज्य सरकार काय या दोघांनाही स्मार्ट सिटी आणि स्मार्टखेडी तयार करण्याची घाई झालेली दिसते. स्मार्ट सिटीपेक्षा एकवेळ स्मार्ट खेडी तयार होणे केव्हाही चांगले. परंतु यासंदर्भात निश्चित धोरण आणि भूमिका नसल्यामुळे या योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये गोंधळ दिसून येतो, याचे ताजे उदाहरण म्हणजे महाराष्ट्रात जवळपास १०० ग्रामपंचायतींचे नगरपालिकेमध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला गेला, परंतु त्या ठिकाणी पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. नगरपालिकांनी आवश्यक असणारा निधीदेखील दिला गेला नाही. इतर साधारण सुविधा उपलब्ध न करू देता केवळ ग्रामपंचायतींचा दर्जा वाढविण्याचा निर्णय घेतला गेला. सरकारी कामकाजाच्या भाषेत ग्रामपंचायतीच्या नगरपालिका जरी झाल्या म्हणजे त्याचा दर्जा वाढला असे समजले जाते, परंतु जोपर्यंत नागरिकांना कार्यक्षम यंत्रणा मिळत नाहीत किंवा त्या नव्या नगरपालिकांचा कारभार वेगाने सुरू होत नाही तोपर्यंत त्याचा दर्जा वाढला असे म्हणता येत नाही. कारण उत्तम कारभार म्हणजे तो दर्जेदारपणा असतो याची सरकार दरबारी कोणाला फारशी माहिती नसावी. कारण सरकारी कारभार म्हटला की तो असाच असायचा असे समीकरण पक्के झाले आहे. नाव बदलले म्हणजे काम बदल नाही किंवा कामात सुधारणा होत नाही, तर कामात सुधारणा झाली तरच नाव बदलले पाहिजे हे लक्षातच घेतले जात नाही. सरकारला जर ग्रामीण भागाचा विकास व्हावा असे वाटत असेल, तर ग्रामपंचायतींना अधिक निधी मिळाला पाहिजे. त्यांच्या कारभारामध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत आणि त्याचा स्मार्ट खेडी तयार करण्याकरिता उपयोगही करता आला पाहिजे. यातून दोन महत्त्वाचे उद्देश साध्य होऊ शकतात. एक म्हणजे खेड्याकडून शहराकडे येणारे लोकांचे लोंढे थांबू शकतात आणि स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होऊ शकतो. एकीकडे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे म्हणतो. परंतु ते करताना निर्णय घेण्याचे अधिकार एकाच ठिकाणी केंद्रित होतात. त्याचा परिणाम म्हणूनच आज ग्रामपंचायतींच्या नगरपालिका होऊनही त्यांच्या व्यवस्थांमध्ये अडचणी निर्माण झालेल्या दिसून येतात.

## साधनसुविधा द्या

सरकारचा हेतू चांगला आहे, परंतु नेहमीप्रमाणे अंमलबजावणीमध्ये नियोजन आणि सुसूत्रता नसल्यामुळे चांगल्या योजनेची धूळधाण होत आहे. ज्यावेळेला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशात १०० स्मार्टसिटी तयार करण्याची घोषणा केली त्याचवेळी देशातील सगळ्या सामान्य माणसांनी स्मार्ट सिटीपेक्षा स्मार्ट खेडी निर्माण करा अशीच प्रतिक्रिया दिली होती. कारण आज भारतात ६० टक्के जनता खेड्यामध्ये राहते आणि त्यांना मूलभूत सोयीसुविधासुध्दा मिळत नाहीत. अगदी अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींपासून ते शुध्द पाणी, आरोग्याच्या चांगल्या सोयी, शिक्षण, वीज, रस्ते या गोष्टीसुध्दा मिळालेल्या नाहीत. अर्थातच त्यातून ग्रामीण भागात पुरेसा रोजगारही निर्माण होऊ शकत नाही. सरकारच्या आकडेवारीप्रमाणे खेड्यातला माणूस फक्त १० ते ३० रुपये रोज कमावू शकतो. कारण त्याला योग्य त्या सुविधा आणि संधी मिळत नाहीत. त्यातून त्याला स्वतःचा विकासही करता येत नाही ही गोष्ट स्पष्टपणे दिसत असूनही किंवा माहीत असूनही सरकारने खेड्यांऐवजी शहरांचा विकास करण्याचे ठरवावे हे आश्चर्यकारक ठरते. अशा परिस्थितीत जर महाराष्ट्र सरकार ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने जर ग्रामपंचायतींना नगरपालिकांचा दर्जा देणार असेल तर त्याची नीट अंमलबजावणी झाली पाहिजे. केवळ राजकीय थाटात घोषणाबाजी न करता प्रामाणिकपणे जर या नव्या नगरपालिकांना साधन-सुविधा आणि पुरेशा निधीची हमी दिली गेली तर त्याचा निश्चित फायदा होईल. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे विकासाची नवी पध्दती निर्माण झाली आहे. संगणक, इंटरनेट या सर्व गोष्टींनी एकूणच सर्वप्रकारच्या कामाला गती दिली आहे.पूर्वीसारखे निर्णयाची वाट पाहत किंवा मनमानीपध्दतीने कामे करण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. इंटरनेटमुळे काही सेकंदात इकडचा निरोप तिकडे पोहचतो. व्हिडिओ कॉन्फरान्सिंगसारख्यामुळे तर मुख्यमंत्र्यांना त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधता येऊ शकतो.इतका जर बदल होत असेल तर शासनाच्या कार्यपध्दतीतही त्याचा फरक जाणवला पाहिजे.

## ग्रामीण भागाचा विकास

आपल्या महाराष्ट्राचे जरी उदाहरण घेतले तरी पाचशे सहाशे खेडी असलेल्या आपल्या राज्यात ग्रामपंचायतींना मजबूत करून विकास साधता येऊ शकतो. फक्त आज प्रश्न असा निर्माण झाला आहे की, या सगळ्या छोट्या छोट्या ग्रामपंचायतींची उत्पादनाची साधने कमी आहेत त्याऐवजी आजूबाजूच्या पाच सहा ग्रामपंचायती एकत्र करून पंचवीस हजार लोकसंख्या असलेल्या भागात नगरपालिका निर्माण करणे आणि विकासाची नवी पध्दती निर्माण करणे सोपे जाऊ शकते. यामुळे पैशाचा योग्य वापर होऊ शकेल. छोट्या छोट्या ग्रामपंचायतींना निधी देण्याच्या किंवा त्यांच्या कामांवर लक्ष ठेवण्याच्या प्रक्रियेमुळे भ्रष्टाचाराला वाव मिळत होता. त्याला काही प्रमाणात अटकाव घालता येईल अर्थात नगरपालिकांवर तितकेच कडक लक्ष ठेवावे लागेल.आणि तिथल्या राजकारणापेक्षा समाजकारणाला गती देता येऊ शकेल. आज महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये आदिवासी पाडे आहेत. परंतु त्याठिकाणी वीज, पाण्यासारख्या मुलभूत सुविधादेखील नाहीत. कदाचित अशा पाड्यांना एकत्रित करून एखादे ग्रामपंचायत किंवा नगरपालिका स्थापन झाली तर त्या भागाचा विकास करायला गती देता येऊ शकेल. ग्रामपंचायतीचे नगरपालिकेत रूपांतर करण्यामागे काही प्रमाणात राजकीय हेतू जरी असला तरी सामान्य माणसाला विशेषतः वर्षानुवर्षे ग्रामीण भागात अडीअडचणींमध्ये जीवन जगणाऱ्यांना एक नवी संधी मिळू शकणार आहे. निर्णय केला म्हणजे जबाबदारी संपली असे होत नाही. तो निर्णय पूर्णत्त्वास नेण्याची आवश्यकता असते. सरकारने त्यादृष्टीने उपाययोजना केली पाहिजे.